पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८,लेखा विभाग
क्र. लेखा/६/कावि/१५२०/२०१४
दिनांक :- २७/१०/२०१४

**विषय :- सन २०१५-२०१६ चे अंदाजपत्रकात नागरिकांचा सहभाग.**

**परिपत्रक,**

सन २००७-२००८ पासुन महापालिकेचे अंदाजपत्रक तयार करताना नागरिकांच्या सुचनेनुसार आवश्यक कामांचा अंतर्भाव अंदाजपत्रकात करणे, असा उपक्रम महापालिकेने राबविलेला असून त्यासाठी वर्तमानपत्रात प्रसिध्दी करुन नागरिकांना कामे सुचविणेबाबत जाहिर आवाहन करण्यात आलेले होते. त्याच धर्तीवर सन २०१५-२०१६ चे अंदाजपत्रक तयार करताना सदर उपक्रमास नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळावा व अंदाजपत्रक तयार करताना क्षेत्रिय कार्यालये, यांचे स्तरावर नागरिकांकडून त्यांच्या क्षेत्रियात करावयाच्या कामांबाबत सुचनांचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करणेसाठी खालील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

१) लेखा विभागाकडून दैनिक वृत्तपत्रात जाहिर आवाहन प्रसिध्द करणेत येईल. त्याची प्रत व अर्जाचा नमुना प्रत्येक क्षेत्रिय अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयाच्या दर्शनी ठिकाणी लावून या उपक्रमाची माहिती नागरिकांना द्यावी.

२) मा. क्षेत्रिय समिती अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली क्षेत्रिय समितीची बैठक प्रस्तुत प्रयोजनाचे विचारार्थ बोलविण्यात यावी. त्या बैठकीमध्ये क्षेत्रिय समिती सदस्यांबरोबर, नागरिकांच्या अंदाजपत्रक सहभागाबाबत चर्चा घडवून आणावी. नागरिकांच्या सहभा-गातून अंदाजपत्रक तयार करणेबाबतचा प्रारुप कार्य आराखडा तयार करण्यात यावा.

३) एका कामाची रक्कम शक्यतो र.रु. १० लाखापेक्षा जास्त नसावी.

४) नागरिकांकडून आलेले कामांचे प्रस्ताव याबाबत संबंधित कार्यकारी अभियंता यांचेकडून छाननी करुन घेऊन कामांचा प्राधान्य क्रम ठरविण्यात यावा व त्यांचा समावेश क्षेत्रिय समिती अंदाजपत्रकात करुन अंतिमत: मान्यतेसाठी पाठविण्यात यावेत.

५) सहभागी अंदाजपत्रक सन २०१५-२०१६ संदर्भातील नागरिक सूचना अर्ज भरण्या संदर्भातील माहिती, सर्व क्षेत्रिय अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात नागरिकांना सूचना अर्ज वाटपासाठी विनामुल्य उपलब्ध करावयाचे आहे व नागरिकांकडून प्राप्त झालेल्या अर्जाची पोहच देऊन जाहिर केलेल्या तारखेस किती कामांचा समावेश अंदाजपत्रकात केला आहे ते जाहिर करावे.

६) मा. क्षेत्रिय समितीच्या मान्यतेनंतर क्षेत्रिय अधिकारी यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व क्षेत्रियांची एकत्रित माहिती महापालिका अंदाजपत्रकात समाविष्ट करणेसाठी मा. आयुक्त यांचेकडे सादर करावी. त्यासोबत

७) सन २०१५-२०१६ सहभागी अंदाजपत्रक नागरिकांनी सुचविलेली कामे याबाबतचा लेखाशिर्षानुसार गोषवारा स्वतंत्र सादर करावा. नागरिकांनी सुचविलेल्या ज्या कामांचा समावेश अंदाजपत्रकात करण्यात आलेला नाही किंवा करणे शक्य नाही. त्याबाबतच्याकारणासह माहिती लेखा विभागाकडे दोन प्रतीत पाठवावी.

८) नागरिकांचे सूचना अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख १५/११/२०१४ अशी असून त्यानंतर मा. क्षेत्रिय समिती सभेस अंदाजपत्रक आराखडा सादर करुन त्यावर चर्चा करुन शिफारशीसह अंदाजपत्रक माहिती म.न.पा. अंदाजपत्रकात समावेश करणेसाठी दि. १८/११/२०१४ पुर्वी वेळेचे पालन करुन सादर करावी.

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८

**प्रति,**

१) क्षेत्रिय अधिकारी
२) क्षेत्रिय कार्यकारी अभियंता
३) स्थापत्य मुख्य कार्यालय
४) विद्युत मुख्य कार्यालय
५) पाणीपुरवठा मुख्य कार्यालय.